


‘दृष्टिकोन’ लेखमाला : लेख तिसरा

# आनंदवनभुवनी

केतकी घाटे

ऑगस्ट २०२०

बसमध्ये बसल्या बसल्या गाण्याच्या भेंड्या रंगल्या होत्या. आज गाण्याच्या भेंड्या पानं, फुलं, पक्षी, चंद्र, तारे यांच्याभोवती गुंफलेल्या होत्या. जुईने सगळ्या जणींना सुचवलं होतं की भेंड्या खेळायच्या तर प्रत्येक गाण्यात निसर्गातला एक तरी घटक असायला हवा. सगळ्या साळकाया माळकायांनी तिची कल्पना उचलून धरली आणि मेंदीच्या पानावर, मोगरा फुलला, केतकी गुलाब जुही, चंद्र आहे साक्षीला वगैरे गाण्यांनी मिनी बस दुमदुमवून टाकली. धरणाला लागून असलेला छोटा घाट वजा चढण रस्ता पार करत गाडी बॅकवॉटर्सला समांतर रस्त्याला लागली तश्या भेंड्या आपसूकच थांबल्या.

'अय्या ! कित्ती सुंदर आहे हा परिसर', बॅकवॉटर्सच पहिलं दृश्य बघून प्रिया जवळ जवळ किंचाळलीच, 'कित्ती सुंदर हिरवेगार डोंगर हे आणि केवढी झाडं आणि ग्रीनरी ही !'

सोलापूरची प्रिया सह्याद्रीत कदाचित प्रथमच येत होती. एवढी हिरवाई बघून हरखून गेली होती. सप्टेंबर अखेर होती त्यामुळे वातावरण आल्हाददायक होतं. आसमंत ढगांनी भरलेला होता. तरीदेखील सूर्य मधेच

डोकावत होता. मधूनच पावसाची हलकी सर येत होती. वॉव, भारी, ऑसम वगैरे शब्दांनी गाडी भरून गेली.

‘जुई, थांबून फोटो काढूयात ना मस्त,’ अनुने सगळ्यांचाच विचार बोलून दाखवला.

‘हो. आपण नाश्त्यासाठी थांबणारच आहोत जरा पुढे,’ जुई म्हणाली.

आणि थोड्याच वेळात एका हॉटेल रानसई नावाच्या छोट्याशा हॉटेलपाशी बस थांबली. आदित्य चालका शेजारी बसलेला होता. त्यामुळे रस्ता सांगणे, कुठे थांबायचं सांगणे ह्याची आज तिला चिंता नव्हती. सगळ्याजणी उतरल्या आणि समोरच्या पाण्याचे आणि हिरव्यागार डोंगरांचे फोटो काढण्यात गुंगल्या. आदित्यला विविध अँगलमधून फोटो काढायला सांगून वेडं केलं. आज आपला पुरता कन्हैया होणार हे त्याला कळून चुकलं.

जुई हॉटेल मालकांची विचारपूस करत होती. नेहेमीचाच स्टॉप असल्याने ते चांगले मित्र झाले होते. आधीच फोन करून ठेवल्याप्रमाणे पोहे आणि मिसळ तयार होती. सगळ्यांनी मिसळीवर ताव मारला आणि पुढे निघाले.

थोडं पुढे गेल्यावर एक पिवळा जर्द फुलांनी भरलेला आख्खा डोंगर उतार बघून सगळ्या सख्या पुनःश्च चित्कारल्या. ‘वॉsव’, किती सुंदर’, ‘जुई काय आहेत ही फुलं’, ‘ए प्लिज थांबूयात ना’..

बस थांबवली तशी सगळ्या पटापट उतरून दंगा करत त्या पिवळ्या फुलांच्या ताटव्यात शिरल्या. फोटो घेण्यात मग्न झाल्या.



‘काय नाव आहे या फुलांचं? शेवंतीसारखी वाटत आहेत’, नेहाने प्रश्न केला.

‘सोनकी म्हणतात इकडे या फुलांना. आणि बरोबर आहे तुझं शेवंतीच्या म्हणजेच एस्टरेसी कुळातली आहे ही वनस्पती. वाईल्ड फ्लॉवर आहे. आणि अत्यंत महत्वाचं आहे. मूळच जंगल नाहीस झालं आहे हे ते दर्शवतंच पण ते इतकं पसरतं की त्याचा माती सुधरण्यासाठी उपयोग होतो.’ जुई म्हणाली.

तेवढ्यात आदित्यने सगळ्यांचं लक्ष अजून एका पॅचकडे वेधलं, ‘अरे ते बघा तिकडे अजून एक पॅच आहे आणि त्यात कित्ती फुलपाखरं आहेत. ती फुलं काही वेगळी आहेत का जुई?’

‘हो ते कारळं आहे. ते मुद्दाम पेरतात. ह्या भागात सगळ्या भाज्यांमध्ये, आपण जसा मसाला घालतो तसं, कारळ्याच कूट घालतात. आणि ही वनस्पती म्हणजे फुलपाखरांसाठी उत्तम खाद्य वनस्पती आहे म्हणजे फूड प्लांट. ह्या फुलांमध्ये भरपूर मकरंद असतो त्यामुळे तो घ्यायला एवढी फुलपाखरं आली आहेत.’

‘अशी उतारावर का पेरली आहेत पण?’, इति नेहा.

‘ह्या शेतीच्या प्रकाराला स्थलांतरित शेती म्हणतात. म्हणजे असं की इथले लोक उतारवरचं जंगल साफ करून तिथे सलग तीन वर्षं तीन पिकं घेतात. नाचणी, वरई

आणि कारळं. उतारच असल्याने तिसऱ्या वर्षीचं पीक काढेपर्यंत जमिनीतली पोषक द्रव्य जवळ जवळ संपलेली असतात. मग ते हा पॅच वरकस ठेवतात. म्हणजे सोडून देतात. इंग्रजीत fallow म्हणतात. आणि शेजारचा दुसरा पॅच शेतीसाठी घेतात. तिथलं जंगल कापून तिथे तीन वर्षं वापरून पुढचा पॅच निवडतात. असं करत नऊ ते बारा वर्षांनी पहिल्या पॅचवर येतात. म्हणूनच या शेतीला स्थलांतरित शेती म्हणतात.'

'ओह मग शेतीचा प्रकार म्हणून हे कितपत सस्टेनेबल आहे? आणि ह्याने शिवाय जंगलांचं नुकसान होत असेल?', प्रियाने प्रश्न केला.

'हो जंगलांचं नुकसान होतं पण 'शेती' म्हणून पाहिलं आणि 'योग्य प्रमाणात' जमीन वापरली तर एका दृष्टिकोनातून सस्टेनेबल आहे ही शेती, म्हणजे यांत्रिक आणि हरितक्रांती प्रेरित शेतीशी तुलना केली तर त्यापेक्षा निश्चित बरी कारण यात निसर्गाचीच सबसिडी वापरली जाते. वरकस काळात जंगल पुन्हा तयार होतं; ते पोषकद्रव्य परत जमिनीत तयार करतं; ज्यावर पुनः पुन्हा शेती केली जाते. पण अलीकडे काही वर्षात, विशेषतः धरणं बांधल्यानंतर, ह्या शेतीचं प्रमाण इतकं

वाढलं की खूप सारे उतार शेतीखाली आले. आणि वरकस ठेवण्याचा काळ पण कमी झाला. त्यात वणवे लावले जातात आणि गुरांची मुक्त चराई पण चालते. या सगळ्यामुळे अधिकाधिक उतारांची जंगल तयार करण्याची क्षमताच क्षीण झाली आहे. त्यामुळेच मग सोनकीचे उतार अधिक दिसतात. मूळची जंगलं राहिली नाहीत आता. कुठेतरी एखादा तुकडा दिसतो देवराईच्या स्वरूपात जो बघायला तर आपण आलो आहोत खास.... चला आता. नाहीतर देवराईत फार वेळ मिळायचा नाही', जुई म्हणाली.

देवराईत पोचेपर्यंत अकरा वाजले. आत शिरायच्या आधीच जुईने सगळ्यांना सूचना दिल्या. शक्यतो पाय वाटेवरून चालण्याचा, आवाज कमी ठेवण्याचा वगैरे. सगळ्या जणी आत शिरल्या आणि त्या गडद अंधाराने काहीशा दडपल्या, भारावून गेल्या. शांतपणे आणि सावकाश जुईच्या मागे चालत होत्या. त्या जंगलात एक विशिष्ट सुवास होता. सर्वत्र पालापाचोळ्याचा दाट लालसर काळा थर होता. तिथली आर्द्रता शरीराला जाणवण्याइतपत जास्त होती. तापमान बाहेरच्या पेक्षा कमी होतं. वाटेवर दोन्ही बाजूला अतिशय विशाल बुंधे



असलेले अति उंच असे वृक्ष होते. त्यांचे शेंडे बघता बघता एक दोघींच्या टोप्या मागे पडल्या. जरा बाजूला ओढ्याचा प्रवाह होता. त्याचा मंत्रमुग्ध आवाज ऐकत सगळ्या जणी सावकाश अंदाज घेत चालत होत्या. तेवढ्यात एक अतिशय सुंदर अशी शीळ कानावर आली.

‘हा पर्वत कस्तुर ! अतिशय सुंदर गाणारा पक्षी.’ जुईच्या आवाजाने शांतता भंग झाली.

ती संधी न सोडता नेहाने प्रश्न सुरु केले, ‘जुईताई, हे कसले भारी बुंधे आहेत हे. कुठली झाडं आहेत ही.’

‘येस.. सांगते. मुलींनो आपण अतिशय नशीबवान आहोत आपल्याला ही झाडं, ह्या सगळ्या जाती बघायला मिळत आहेत,’ जुईचा चेहरा अतिशय प्रफुल्लित झाला

होता, ‘ही सगळी तशी अत्यंत दुर्मिळ झाडं आहेत. केवळ आणि केवळ ह्या देवराईसारख्या अधिवासात सापडणारी. ह्यांना हॅबिटॅट स्पेशालिस्ट म्हणतात. हे जे समोरचं दिसतंय ना बुंध्याला पडदी तयार झालेलं हे आहे लोत, फायकस नर्वोसा, म्हणजे उंबराचा भाऊ म्हणूयात हवंतर. आणि ह्या ज्या पडदी तयार झाल्या आहेत त्यांना बटरेस रूट्स म्हणतात. आधारमुळे. ह्या वृक्षांना गावाकडचे लोक अतिशय मानतात. कितीही वयस्कर माणसाला जरी विचारलं तरी ते सांगतात ही झाडं त्यांच्या लहानपणापासून अशीच आहेत. कुणीही त्यांना वाढताना पाहिलेलं नाही ही मोठीच गंमत वाटते मला.’

मग जुईने चालता चालता सगळ्यांना रानजायफ़ळ, गुळूम, रगतवड, फणसाडा, सप्तपर्णी, डोंगरी अशी विविध झाडांची ओळख करून दिली.

‘वॉव !,’ श्रुती म्हणाली, ‘हे भारीच आहे ग. आमच्या कोकणात पण आहेत अशा देवराया पण इतकी मोठी झाडं एवढ्या मोठ्या प्रमाणात नाही पाहिली कधी. एखादं निवाचं वगैरे असं मोठं झाड असतं.’

‘हं, कोकणातल्या बऱ्याच देवराया सेकंडरी आहेत. म्हणजे आधीचं मूळचं जंगल कापल्यामुळे काही वर्षात

पुनःश्च तयार झालेलं. त्यामुळे त्यांचं मूळ रूप नाहीसं झालं आहे. हे बघा आता. देवरायांचं किंवा कुठल्याही परिपक्व जंगलाचं आणिक एक विशेष लक्षण.' जुईने एका मोठ्या जाड लाकडी पिळयाकडे सगळयांचं लक्ष वेधलं.

'ओह माय गॉड !,' एक दोघी म्हणाल्या, 'बापरे भीतीदायक आहे ग हे. एखाद्या हॉरर मूव्हीत असतं तसं वाटतंय.'

'हा हा,' जुईला हसू आलं, 'हॉरर प्रसंग अशा ठिकाणी चित्रित करतात म्हणून हे हॉरर वाटतं. हे महावेल लई भारी आहेत. ह्याचं नाव गारंबी. आपल्या टिंगीच्याच उंचीची शेंग येते याला. पूर्वी सर्वत्र चांगली जंगलं होती तेव्हा एका गावात रुजलेल्या वेलाच्या फांद्या आणि ताणे पुढच्या वाडीपर्यंत गेलेले असायचे. ह्या वेलांमुळे ह्या जंगलातलं हे विशिष्ट तापमान, मायक्रो क्लायमेट स्थिर राहायला मदत होते. त्यामुळे असंख्य स्पेशल गोष्टी इथे नांदतात. इथल्या बुरश्या, शेवाळं ते ऑर्किड्स, फर्न, किडे, पक्षी सगळंच स्पेशल !'

'अय्या ऑर्किड ?! म्हणजे त्यांची फुलं खूप दिवस टिकतात ना?', अनुने प्रश्न केला.

‘हो ते बघा त्या फांदीवर इथलं एरीडीस नावाचं सुवासिक ऑर्किड आहे. मे महिन्यात फुलतं’, जुईने एका फांदीकडे बोट केलं.

‘ते असं झाडाला चिकटलं आहे तर ते पॅरासाईट असतं का ग?’, श्रुतीचा प्रश्न.

‘ना ना. ते केवळ झाडाचा आधार घेत इथल्या ओलाव्यावर वाढतं. परजीवी नाहीये’, जुईने स्पष्ट केलं.

आदित्य जरा पुढे चालत गेला होता. तो घाईने परत आला आणि दबक्या आवाजात म्हणाला, ‘अग इकडे या लवकर. शेकरू बसलंय अगदी समोरच.’



बऱ्याचशा मुलींच्या चेहऱ्यावर प्रश्न चिन्ह बघून जुई म्हणाली, ‘शेकरू म्हणजे इथली मोठी खार. एकदम गोड असते. या पटकन बघूया.’

सगळ्या जणी शेकरू बघून खुश झाल्या. ‘केवढी मोठी शेपटी आहे तिची.

मी तर आता असं सॉफ्ट टॉय करणार लगेच!', क्राफ्टची आवड असणारी श्रुती म्हणाली.

तेवढ्यात खूप मोठा आवाज आला. सगळ्या जणी घाबरल्याच जरा. पण जुईने लगेचच त्यांना सांगितलं, 'हा आवाज ग्रेट पाईड हॉर्नबिल ह्या पक्ष्याचा आहे. खूप मोठा असतो हा पक्षी. एक दीड मीटरपेक्षा जास्त उंची असते त्याची. ह्या पक्ष्याची गंमत म्हणजे हे पक्षी झाडाच्या ढोलीत घरटं तयार करतात. मग मादी आत बसून त्या ढोलीचं तोंड जवळ जवळ पूर्ण बंद करते. स्वतःचेच मल मूत्र वापरून. ती जणू सिलच करते स्वतःला आत. त्यात अंडी घालते. आणि आपली सगळी पिसं गाळून टाकून अंडी उबवायला बसते. ती ह्या काळात बाहेर पडत नाही. एका छोट्याशा चपट्या भोकातून नर तिला चक्क अन्न आणून भरवत राहतो. एक ते दीड महिना ! पिल्लं जरा मोठी झाली की मादी बाहेर पडते. आणि मग दोघे मिळून पिल्लाना भरवतात.'

'आईला, इंट्रेस्टिंग आहे हा हॉर्नबिल,' अनु म्हणाली.

मग जुईने सगळ्यांना अजून काही स्पेशल पक्षी दुर्बिणीतून दाखवले. त्यात काही फ्लाय कॅचर होते,

पिवळे बुलबुल, काळे बुलबुल, शामा, क्रिमझन सनबर्ड असे विविध पक्षी होते. या सगळ्यावर कडी झाली जेव्हा जुईला ओढ्याच्याकाठी किंग फिशर्स मधला अत्यंत दुर्मिळ असा रंगीबेरंगी ओरिएंटल द्वार्फ किंगफिशर दिसला. ती केवळ नाचायचीच बाकी होती.



सगळ्या जणी पण तितक्याच खुश होत्या. एरवी निसर्ग सहलींना केवळ गाणी म्हणत, पावसात भिजण्यापेक्षा हा अनुभव खूप वेगळा, भारावून टाकणारा, अंतर्मुख करायला लावणारा होता. एवढा समृद्ध निसर्ग टिकवण्यासाठी आपण काही करतो का असे स्वत:लाच प्रश्न विचारणारा होता.

‘जुईताई, ही देवराईचं का राखली या लोकांनी. म्हणजे बाकीचा सगळा प्रदेश कसा ओपन आहे तसा. मग इथेच देवराई करायची असं का ठरवलं लोकांनी?’

‘हं.. हीच जागा का निवडली असं नाही सांगता येणार. पण देवराया का राखायला सुरवात झाली ह्याच्या अनेक स्टोरीज आहेत. सगळ्यात कॉमन गोष्ट म्हणजे त्यांनी

तिथल्या देवतेचा किंवा देवाचा आदर म्हणून म्हणा किंवा त्या देवाला घाबरून म्हणा जंगलं राखली आहेत. त्यांचा असा विश्वास असतो की इथून एकही झाड तोडलं तर देव आपल्याला पाप देईल आणि काहीतरी बरं वाईट होईल. आणि कधीतरी अशा घटना पण घडतात की ज्याने हा विश्वास दुणावला जातो आणि देवराया राखल्या गेल्या. आता ह्याच देवराईचं उदाहरण घ्या, इथल्या गावातल्या पुढच्या पिढीला हा अंधविश्वास मान्य नव्हता म्हणून त्यांनी ही देवराई एका बाहेरच्या कंत्राटदाराला विकली. त्यातून लाखो रुपये मिळणार होते. गावातल्या बुजुर्ग मंडळींनी त्यांना खूप समजावण्याचा प्रयत्न केला पण कुणी ऐकलं नाही आणि आणि त्या कंत्राटदाराने काम सुरु केलं. पण एक भयंकर आश्चर्य म्हणजे त्याच रात्री तो कंत्राटदार उलट्या होऊन मेला !'

'बाप रे!' 'खरंच?!' एक दोघी ओरडल्याच.

'हो खरं आहेच. कदाचित तो कंत्राटदार काहीतरी योगायोग होऊन मेला असेल. पण त्यामुळे काम आपसूकच थांबलं हे सांगायला नकोच. पण त्याच्यामुळे ही राई मात्र अशीच उभी आहे अजून. खणखणीत..

पाचूसारखी चमचम करत !' जुईने वरच्या कॅनोपीकडे बघत हवेत एक फ्लायिंग किस दिला, 'पण ह्या देवराया अत्यंत व्हल्नरेबल आहेत. ह्या जातींना माणसाने फार पर्याय ठेवलेला नाही. आधुनिकीकरणाच्या रेट्यात या विशेष जातींना काहीही स्थान नाही. त्यांना आपण पर्याय पण ठेवलेला नाही. माणूस स्वतःसाठी अनेक पर्याय निर्माण करू शकतो. पण ह्या जातींना टिकायचं असेल तर माणसाने त्यांना हात द्यावा लागेल. अन्यथा त्यांना काही फार भविष्य नाही.'

'आम्ही काय करू शकतो ह्यासाठी?', अनुने प्रश्न केला.

'एक एक देवराई दत्तक घ्या सरळ ! इथल्या लोकांना आर्थिक, मानसिक जो लागेल तो आधार दिलात तर या देवराया टिकतील. इतकी वर्षं त्यांनी टिकवल्याचं आहेत. यापुढे आपण त्यात सहभागी व्हायला लागेल.'

'चला मग मुलींनो हॉस्टेल तर्फे एक फंड उभा करू. ज्यांना शक्य नाही त्यांनी श्रमदान करू. वेळ देऊ. पण काहीतरी नक्की करू जुई.'

'येस करूयात अशी काही योजना ! हॉस्टेल स्पेशल ! चला पुढे जाऊ आता', जुई म्हणाली.

मग सगळे जण राईतल्या देवापाशी पोचले. देव म्हणजे केवळ काही गोलाकार दगड शेंदूर लाऊन एका ओळीत ठेवले होते. त्यांच्या भोवती दगड लावून एक चौरस केला होता. तिथेच त्यातल्या त्यात कोरड्या जागा, दगड शोधून सगळे खाली बसले. आदित्य आजूबाजूला हिंडत जवळच्या बारीक ओलसर मातीत कुणाच्या पायाचे ठसे दिसत आहेत का हे बघत होता. काही फारसे दिसत नव्हते. पण जवळच एका खडकावर साळींदराची विष्ठा होती. ती त्याने सगळयांना दाखवली. मग जुईने इथे कुठले कुठले सस्तन प्राणी दिसतात ते सांगितलं. विष्ठेवरून ते शाकाहारी की मांसाहारी हे कसं ओळखायचं हे सांगितलं.

'ह्या देवराया म्हणजे बायोडायव्हर्सिटीची जिवंत संग्रहालयच आहेत जणू', आदित्य म्हणाला.

'हो अगदीच,' असं म्हणत जुई उठली, 'ह्या राया म्हणजे माझ्यासाठी आनंदाचे स्रोत आहेत. इथल्या ह्या वृक्ष वेली, पक्षी, बुरश्या, हा पालापाचोळा, हा ओलावा... हे सगळे सतत मला खेचत असतात इथे. इथे जी शांतता, पवित्रता आहे ती विलक्षण आहे.. इथून पाय निघणं अवघड आहे पण जायला हवं आता. जवळच्याच

वाडीत जेवण सांगितलं आहे. तिथे जेऊ आणि निघू परत.'

सगळ्या जणी खूप खुश होत्या. इथे आता परत परत येत राहायचं असं ठरवून सगळ्या जणी बघितलेल्या गोष्टींची उजळणी करत बाहेर पडल्या.

❖ ❖ ❖